# ‘आयआयएम’, नागपूर देणार नौदलास व्यवस्थापनाचे धडे

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

> सशस्त्र दलाचा ‘एमएमआय’ नागपूरशी पहिलाचा सामंजस्य करार आहे. यापूर्वी देशातील संस्थाशी सशस्त्र दलाचे करार झाले आहे. या करारामुळे सेवेतील कर्मचारी, अधिकारी व्यवस्थापनाचे अद्ययावत प्रशिक्षण मिळेल. तसेच हे कौशल्य निवृत्तीनंतर कर्मचारी, अधिकाऱ्यांना सशस्त्र दलाबाहेर नोकरी, व्यवसाय करण्यास उपयोगी पडणार आहे.
>
> **- विंग कमांडर रत्नाकर सिंह,**
> जनसंपर्क अधिकारी, संरक्षण मंत्रालय.

**नागपूर :** नौदलातील कर्मचारी, अधिकाऱ्यांना व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आणि त्यांचे व्यवस्थापनाचे कौशल्य अद्ययावत ठेवण्याचे काम भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम, नागपूर) करणार आहे. यासाठी भारतीय नौदल आणि आआयएम, नागपूर यांच्या सामंजस्य करार झाला आहे. नागपूर, ‘आयआयएम’ नागपूरशी सशस्त्र दलाशी झालेला पहिलाचा करार आहे.

सशस्त्र दलातील विशेषतः नौदलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना व्यवसाय व्यवस्थापन, आर्थिक व्यवस्थापन, ब्लॉक चेन, प्रोजेक्ट मॅनिजमेंट, स्ट्रॅटिजिक मॅनिजमेंट, डिजिटल मार्केटिंग, सप्लाय चेन, लॉजिस्टिक मॅनिजमेंट या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण देणे तसेच कौशल्य वाढवण्यासाठीचे हे प्रयत्न आहेत. त्यासाठी भारतीय नौदल आणि ‘आयआयएम’ नागपूर यांनी १३ ऑक्टोबर २०२२ रोजी सामंजस्य करण्यात आला आहे. या कराराचा उद्देश अधिकारी, कर्मचाऱ्यांना व्यवस्थापनाचे ज्ञान अद्ययावत करणे आहे. यामुळे कर्मचाऱ्यांची प्रगती तर होईल, पण नौदलाचे व्यवस्थापन आणखी अचूकपणे होण्यास मदत होईल. याशिवाय नौदलातून निवृत्त झाल्यानंतर कर्मचारी, अधिकाऱ्यांना हे व्यवस्थापन कौशल्य नागरी सेवेत काम करताना उपयोगी ठरणार आहे. स्वेच्छानिवृत्ती किंवा निवृत्त कर्मचाऱ्यांना नागरी सेवेत नोकरी करण्याची इच्छणाऱ्यांना ‘आयआयएम’, नागपूरचे प्रशिक्षण कामात येणार आहे. संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्याकडे ‘आयआयएम’, नागपूरचे प्रमाणपत्र राहणार आहे. नौदलाच्या गरज बघून अभ्यासक्रम तयार केला जाणार आहे त्यासाठी नौदल, मुख्यालयाचे एक पथक लवकरच ‘आयआयएम’, नागपूरला भेट देणार आहे. तसेच या सामंजस्य करारामुळे नौदल आणि ‘आयआयएम’, नागपूरचे अधिकारी संबंधित संस्थांना भेटी देतील.

‘आयआयएम’ नागपूरचे संचालक डॉ. भीमराया अंबाण्णा मेत्री म्हणाले, ऑन-कॅम्पस आणि ऑफ-कॅम्पस कार्यक्रम संयुक्तपणे तयार केला आहे त्यामुळे भारतीय नौदलाचे आत्मनिर्भर होण्याचे स्वप्न साकार करण्यास मदत होईल. भारतीय नौदलाचे प्रमुख व्हाईस अ‍ॅडमिरल दिनेश के. त्रिपाठी म्हणाले, या सामंजस्य करारामुळे कर्मचारी भारतीय नौदलास नागरी जगतातील ताज्या घडामोडींबाबत अद्ययावत ठेवण्यासाठी ‘आयआयएम’च्या संपर्कात असतील.